रविवार दि.१६ जून २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २८८
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com


# शिष्टमंडळावर विश्वास दाखविल्या बद्दल जरांगे पाटील यांचे आभार

## मराठा आरक्षणासाठी सरकार कटिबद्ध : आमदार राणा जगजितसिंह पाटील

लोकनेता न्यूज नेटवर्क





जरांगे-पाटील यांची प्रकृती उपोषणामुळे खालावत आहे. मराठा समाजाच्या जनभावना राज्य सरकारने ध्यानात घेवून तत्काळ प्रश्न मार्गी लावून मराठा समाजाचे आरक्षण जाहीर करणे आवश्यक असल्याची बाब मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. त्यानुसार मुख्यमंत्री महोदयांनी राज्य सरकारच्या वतीने शिष्टमंडळ पाठविले. शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांच्याशी सकारात्मक संवाद साधला आणि मराठा समाजाच्या मागण्यांबाबत राज्य सरकार अतिशय सकारात्मक पध्दतीने काम करणार असल्याची ग्वाही दिली. पुढील महिनाभरात त्याअनुषंगाने सर्व प्रक्रियांची पूर्तता केली जाईल, असेही शासनाच्यावतीने शिष्टमंडळाने जाहीर केले असल्याची माहिती शिष्टमंडळाचे सदस्य तथा भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवली सराटी येथे ८ जूनपासून आमरण उपोषण सुरू आहे. उपोषणादरम्यान त्यांची तब्येत खालावली होती. याबाबत तातडीने पावले उचलणे आवश्यक असल्याचे सांगत भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि अभिमन्यू पवार यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेवून राज्य सरकारने सकारात्मक संवाद करणे अत्यावश्यक असल्याची विनंती केली होती. त्यानुसार गुरूवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराजे देसाई यांच्या नेतृत्वाखाली खासदार संदिपान भुमरे,आमदार राणाजगजितसिंह पाटील बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत, आमदार मेघना बोर्डीकर यांचे शिष्टमंडळ सरकारच्यावतीने बोलणी करण्यासाठी अंतरवली सराटी येथे पाठविले होते. या शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांच्यासोबत सर्वच मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली. सरकार अतिशय सकारात्मक असल्याचे सांगत सर्व मागण्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली पाऊले उचलण्यासाठी कटीबध्द असल्याचे सांगितले. लोकसभा निवडणुकीतील आचारसंहितेमुळे प्रक्रियेला उशिर झाला असला तरी पुढील महिनाभराच्या कालावधीत आवश्यक असलेल्या सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या जातील आणि जरांगे पाटील यांच्या म्हणण्याप्रमाणे सगेसोयरे अंमलबजावणी तातडीने केली जाईल, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतले जातील आणि न्यायमूर्ती शिंदे समितीला मुदतवाढ देण्यासाठी आवश्यक असलेली कायदेशीर प्रक्रिया रबाविण्यात येईल. त्यासाठी शुक्रवारपासूनच मंत्रालयात बैठक आयोजित केली जाईल, असेही शिष्टमंडळाने आश्वस्त केले असल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली.

उपोषण सोडल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांना छत्रपती संभाजीनगर येथे रूग्णाललयात दाखल केले असून रुग्णालयात जाऊन ना.शंभूराजे देसाई,संदीपान भुमरे व आ.राणा पाटील यांनी त्यांची भेट घेऊन डॉक्टरांसोबत चर्चा केली.जरांगे पाटील यांची प्रकृती स्थिर असून चिंता करण्याची आवश्यकता नसल्याचे सांगून आ.पाटील यांनी जरांगे पाटील यांनी राज्य सरकारच्यावतीने केलेली विनंती मान्य करून उपोषण स्थगित केल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत.

# दीप भारती विद्यालय दानापूर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत

## दीप भारती विद्यालयाचे मुख्याध्यापक वाय. एस गवळी, यांच्या हस्ते पुस्तकाचे वाटप..



लोकनेता न्यूज नेटवर्क


दानापूर । राम शिंदे

भोकरदन तालुक्यातील दानापूर येथे दीप भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दानापूर येथे दिनांक १५. जून २०२४ वार शनिवार रोजी शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांची पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, वर्ग पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक वाय एस.गवळी, यांच्या हस्ते पुस्तकाचे वाटप करण्यात आले शिक्षकाची उत्साही सुरुवात नवीन शैक्षणिक वर्ष शाळेच्या शिक्षकांचा नवीन पोशाख, नव्या उत्साहाने शाळेच्या पहिल्या दिवसाचे स्वागत.

# कौठा येथे चाकू रॉडने मारहण करत व्यापाऱ्यांच्या घरावर दरोडा

लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे



कौठा येथे पोलीस चौकीची गरज असून या भागातील वाढती गुन्हेगारी अवैध धंदे चोऱ्याचे प्रमाण मागील तीन महिन्यात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे, असे गावकऱ्यांत बोलल जात आहे.

कंधार तालुक्यातील मागील काही दिवसांपासून कौठा परिसरात चोरट्यांनी जनावरे पाण्याच्या मोटारी पळवल्याच्या घटना ताज्या असतानाच दि १५ जुन रोजी पहाटे ३ ते ३:३० सुमारास राष्ट्रीय महामार्ग लगत असलेल्या व्यापाऱ्यांचे घर फोडून ४० तोळे सोन २२ लाख रुपये नगदी असा मोठा ऐवज पळवल्याची घटना कंधार पोलीस स्थानकापासून पासून ३० कि मी अंतरावर असलेल्या कौठा येथे घडली आहे.

कौठा येथे कृषी सेवा केंद्र चालक गजानन येरावार याच्या घरी दि.१५ जुन पहाटेच्या सुमारास सहकुटुंब घरी झोपले असता पहाटे तीन ते चार वाजण्याच्या सुमारास गँस कटरने गेट तोडत सहा दरोडेखोर तोंडाला रुमाल बांधून सुरुवातीला दोघा पती-पत्नीचे मोबाईल फोडून व्यापाऱ्यास धमकावत चाकू रॉडने मारहण केली,दरोडेखोरांनी सदरील कुटुंबांवर प्रचंड दहशत निर्माण करत व्यापाऱ्यांच्या उजव्या डोळ्यावर चाकूने तर पायावर रॉडने वार करून लूटमार करण्यात आले.लहान मुलांना जिव मारण्याची धमकी दिल्याने कुटुंब भयभीत झाले होते,घरात आहे ते घेऊन जा पण मारु नका अशी विनवणी कुटुंब करत होते दरोडेखोरांनी ४० तोळे सोन २२ लाख रुपये रोकडा घेऊन केल्याचे सांगितले जात आहे,जिवाच्या भितीने पोलीस कारवाई करण्याची सुध्दा हिमंत कुटुंबं दाखवत नव्हते सदरील कुटुंब प्रचंड दहशती खाली असल्याचे दिसत होते दरोडेखोर हे पांढऱ्या रंगाच्या बोलेरो गाडीत सहा जण गेल्याचे सिसी टिव्ही कॅमेरात कैद झाले आहेत १९७२ नंतर गावात सर्वात मोठा दरोडा असल्याचे वयस्कर लोक सांगत आहेत,घटना स्थळी पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे अतिरिक्त पोलीस अधिक्षक धरणे प्रभारी पोलीस उपअधिक्षक संकेत गोसावी कंधार पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव श्वान पंथक फॉरेन्सिक पथक आदि घटना स्थळावर दाखल झाले आहे श्वान घराच्या आसपासच फिरत होते दरोडेखोराच्या हल्ल्यामुळे व्यापाऱ्यात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.

# शाळेचा पहिला दिवस; स्कुल चले हम चिखल तुडवीत;गुलाबपुष्प नको निदान धड चालता येईल असा रस्ता तरी द्या-डॉ.गणेश ढवळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

जिल्ह्यातील सर्व शाळा आज दि.१५ जुन पासुन सुरु झाल्या आहेत.शाळेचा प्रारंभ हा चैतन्यमय व उत्साहवर्धक झाल्यास शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीसाठी गती मिळावी यासाठी यासाठी शाळेमध्ये नव्याने प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे पहिल्याच दिवशी स्वागत करण्यासाठी शिक्षण विभागाकडून मिठाई, पुष्पगुच्छ वाटपासह विविध उपक्रमांचे नियोजन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे. मात्र बीड तालुक्यातील कामखेडा गावातील शिंदेवस्तीवरील विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी चिखल तुडवीत शाळेत जावे लागत आहे. कामखेडा गावापासून अर्धा किलोमीटर अंतरावरील जवळपास ५० लोकसंख्या असलेल्या ग्रामस्थांनी रस्ता मिळावा यासाठी २-३ वर्षांपासून जिल्हा प्रशासन दरबारी निवेदने देऊन सुद्धा अद्याप कोणतीही उपाययोजना न केल्याने एकंदरीतच शिक्षणाची केवळ कोट्यवधींचा खर्च करून जाहिरात बाजी करणा-या जिल्हा प्रशासनाला याचे गांभीर्य नसुन संबंधित प्रकरणात विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करून रस्त्यासाठी उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी यांच्या मार्फत शिक्षणमंत्री, महिला व बाल कल्याण मंत्री, पालकमंत्री बीड यांना निवेदनाद्वारे केली आहे. दरवर्षी पावसाळ्यात पाणंद रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पाणी साठते.जास्त पाऊस झाल्यास मुलांना शाळा बुडवावी लागते. पाण्यामुळे तसेच साप विंचु आदिमुळे मुलांना शाळेत जाताना भिती वाटते.दुपारी शेतातील कामं सोडून मुलांना घरी आणण्यासाठी यावं लागतं.आमच्या लेकरांच्या शिक्षणिसाठी शासनाने आमची रस्त्याची अडचण दुर करावी.नविन शैक्षणिक वर्षाची सुरुवात मोठ्या उत्साहात व आनंदाने करणे आवश्यक असुन शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करत विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी म्हणून विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प वाटपासह विविध उपक्रमांचे नियोजन करण्याच्या सुचना शिक्षण विभागाने दिलेल्या आहेत.या अनुषंगाने जिल्हा स्तरावरून तालुक्यांना भेटी देण्यासाठी आधिका-यांची नियुक्ती करण्यात आली असुन बीड तालुक्यासाठी उपशिक्षणाधिकारी माजेद काझी यांची निवड करण्यात आली असुन ते कामखेडा गावातील शिंदे वस्ती वरील विद्यार्थ्यांच्या व्यथा जाणून घेतील काय?? असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.




दानापूर येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा मराठी व उर्दू या दोन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके वाटप करण्यात आले आहे तसेच पहिली वर्गात नवीन प्रवेश केलेले विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले या वेळी उपस्तीत समितीचे अध्यक्ष शेख जफर , सुभाष सुरडकर, अजीम शेख, याच्या सह शिक्षक उपस्तीत होते.

# आघाडीतील जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला:'मोठा भाऊ, छोटा भाऊ असे कोणी राहणार नाही'; पृथ्वीराज चव्हाण

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला मिळालेल्या यशानंतर आता विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत सत्तांतर नक्कीच होणार, असा विश्वास काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला आहे. महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेमध्ये चव्हाणांनी थेट जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला असल्याचे सांगितले. आघाडीमध्ये छोटा भाऊ मोठा भाऊ असे कोणी असणार नाही. तर ज्या जागेवर ज्याचा उमेदवार निवडून येण्यासाठी सक्षम असेल, त्याला ती जागा दिली जाईल, असेही चव्हाण यांनी म्हटले आहे.

# छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहिम राजा

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था उमरखेड जिल्हा यवतमाळ यांच्या वतीने कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे माननीय मंत्री मंगल प्रभातजी लोढा साहेब यांचे संकल्पनेतून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई व सहसंचालक प्रादेशिक कार्यालय अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आय. टी. आय. उमरखेड यांचे वतीने दिनांक १९ जून २०२४ रोजी सकाळी १० वाजता आय.टी.आय. उमरखेड येथे छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिराचे उद्घाटन उमरखेड महागाव विधानसभा मतदारसंघाचे मा. आमदार नामदेवरावजी ससाने साहेब यांच्या हस्ते होणारा असून सदर शिबिरामध्ये प्राचार्य गो.सी. गावंडे कॉलेज उमरखेड,डॉ. एम. बी. कदम साहेब , चेअरमन सिद्धिविनायक ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज उमरखेड एकनाथ जी पाटील (जाधव) , कवाने इन्स्टिट्यूट उमरखेड संचालक अमोल कवाने सर , संचालक आय.जी.एम कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट उमरखेड शैलेश मुंनगे सर, रामेश्वर जी बिच्चेवार व गणेशजी शिंदे यांचे दहावी बारावी नंतर पुढे काय? उच्च शिक्षणाच्या संधी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व्यक्तिमत्व विकास रोजगार व स्वयंरोजगारा च्या विविध संधी उद्योगा विषयी माहिती तसेच राष्ट्रीयकृत बँकांच्या शैक्षणिक व रोजगारासाठीच्या कर्ज सुविधाची माहिती या विषयावर सदर शिबिरामध्ये मार्गदर्शन करण्यात येणार आहे तरी सदर शिबिराचा उमरखेड महागाव परिसरातील युवक व युवतीने लाभ घ्यावा व सदर शिबिरासाठी उपस्थित राहावे असे आवाहन आय.टी.आय. प्राचार्य डी.पी. पवार यांनी केले आहे.

## संपादकीय

# नाते रक्ताचे... रक्तगटाचे!

लोकनेता न्यूज नेटवर्क

World Blood Donor Day 2024: सन १९०१मध्ये डॉ. कार्ल लँडस्टेनर यांनी सर्वप्रथम रक्ताची वेगवेगळ्या गटांत विभागणी केली. त्यांच्या या महत्त्वाच्या संशोधनामुळेच एका व्यक्तीचे रक्त दुसऱ्या व्यक्तीस सुरक्षितपणे आणि यशस्वीरीत्या देण्यास प्रारंभ झाला.

माणसाच्या शरीरात सरासरी पाच ते सहा लिटर रक्त असते. शरीरातील रक्ताचे मुख्य काम म्हणजे दळणवळण. रक्त हे ऑक्सिजन, कार्बन डायऑक्साइड, पचलेले अन्नपदार्थ, संप्रेरके (हार्मोन्स) आणि उत्सर्जित करायचे टाकाऊ पदार्थ याचे संपूर्ण शरीरात दळणवळण करते. रक्तातील तांबड्या पेशी फुफ्फुसातून शरीरातील इतर पेशींपर्यंत ऑक्सिजन वाहून नेतात. पांढऱ्या पेशी रोगजंतूंपासून शरीराचे संरक्षण करतात. प्लेटलेट्स रक्त गोठवण्याच्या कामी मदत करतात. या पेशींव्यतिरिक्त रक्तातील द्रवाला रक्तरस (प्लाझ्मा) असे म्हणतात. रक्तातील तांबड्या पेशींवर प्रथिन आणि कार्बोहायड्रेट यांनी बनलेले काही पदार्थ असतात. या रासायनिक पदार्थांमुळेच रक्ताचे विभाजन ए, बी, एबी आणि ओ अशा रक्तगटात होते. रक्तगट ठरवण्यास रक्तरसातील काही प्रथिनेही जबाबदार असतात.सन १९०१मध्ये डॉ. कार्ल लँडस्टेनर यांनी सर्वप्रथम रक्ताची वेगवेगळ्या गटांत विभागणी केली. त्यांच्या या महत्त्वाच्या संशोधनामुळेच एका व्यक्तीचे रक्त दुसऱ्या व्यक्तीस सुरक्षितपणे आणि यशस्वीरीत्या देण्यास प्रारंभ झाला. त्याआधी मात्र एकाचे रक्त दुसऱ्याला अंदाजेच देत. अशावेळी रक्त स्वीकारणारी व्यक्ती कधी बरी व्हायची, तर कधीकधी दगावायची. यावरून या संशोधनाचे महत्त्व लक्षात येईल. म्हणूनच डॉ. कार्ल लँडस्टेनर यांना सन १९३०मध्ये नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले.रक्तगटाचे वैशिष्ट्य म्हणजे जगातील सर्व मानवजातीच्या रक्ताचे वर्गीकरण हे ए, बी, एबी आणि ओ या चार गटांत करता येते. अर्थात याला काही दुर्मिळ अपवाद आहेत. खरोखर निसर्गाचा हा चमत्कारच. थोडे काव्यमय भाषेत बोलायचे झाले, तर सारी मानवजात या रक्तगटाच्या धाग्यांनी एकमेकांशी बांधली गेली आहे. आपल्यापैकी प्रत्येक जण दुसऱ्याशी (रक्तगट जुळला की) रक्ताच्या नात्याने जोडला गेलेला आहे!

तांबड्या पेशींवरील काही विशिष्ट प्रथिने आणि कार्बोहायड्रेटयुक्त पदार्थांमुळे रक्तगट ठरतो. या पदार्थांना अँटिजेन असे म्हणतात आणि रक्तरसात जे प्रथिन असते त्यांना अँटिबॉडी असे म्हणतात. ए रक्तगटामध्ये तांबड्या पेशींवर ए नावाचा अँटिजेन असतो, आणि रक्तरसात बी अँटिजेनविरोधी अँटिबॉडी असते. बी रक्तगटामध्ये तांबड्या पेशींवर थोडी वेगळी संरचना असलेला पदार्थ असतो. त्याला बी अँटिजेन म्हणतात. या माणसाच्या रक्तरसात मात्र ए अँटिजेनविरोधी अँटिबॉडी असतात. एबी या रक्तगटात मात्र तांबड्या पेशींवर ए आणि बी हे दोन्ही अँटिजेन असतात; परंतु त्यांच्या रक्तरसात ए किंवा बी अँटिजेनविरोधी कोणतीही अँटिबॉडी नसते. ओ या रक्तगटामध्ये तांबड्या पेशीवर ए आणि बी हे दोन्हीही अँटिजेन नसतात. मात्र रक्तरसात ए आणि बी या दोन्ही अँटिजेनविरोधी अँटिबॉडी असतात.रक्तगटाची रचना कळल्यावर ए गटाचे रक्त बी गटाच्या माणसाच्या शरीरात गेले तर काय होईल, याची कल्पना येईल. बी गटाच्या रक्तरसात ए अँटीजेनविरोधी अँटिबॉडी असतात. या अँटिबॉडी ए तांबड्या पेशींशी संयोग पावतात. त्यामुळे बऱ्याच तांबड्या पेशी एकत्र येऊन एकमेकांना चिकटतात. त्यांच्या लहान गुठळ्या बनू लागतात. अशा ए तांबड्या पेशींच्या गुठळ्या, ते रक्त स्वीकारलेल्या माणसाच्या रक्तवाहिन्यात, केशवाहिन्यात अडकून बसतात. त्यामुळे रक्ताभिसरणात अडथळा निर्माण होतो आणि रक्ताभिसरण थांबूही शकते. अशावेळी रक्त स्वीकारणाऱ्याच्या ते जिवावरही बेतू शकते. शिवाय अशा गाठी तयार झाल्यावर तांबड्या पेशी फुटू शकतात.म्हणून रक्त आवश्यक असलेल्या माणसाला त्याच्याच दटाचे रक्त देणे हे उत्तम. तरीही, एबी रक्तगटाच्या व्यक्तीस ए, बी, एबी किंवा ओ या चारही गटांच्या रक्तदात्यांचे रक्त चालू शकते. ओ रक्तगटाची व्यक्ती चारही ए, बी, एबी आणि ओ रक्तगटांच्या व्यक्तीस रक्त देऊ शकते. म्हणून ओ रक्तगटास सर्वांना रक्त देणारा रक्तगट म्हणतात; परंतु ओ रक्तगटाची व्यक्ती फक्त ओ रक्तगटाच्या माणसाचेच रक्त स्वीकारू शकते.

रक्तगटाबद्दल ऐकताना आपण केवळ ए, बी, एबी, ओ एवढेच शब्द ऐकत नाही; तर ए–पॉझिटिव्ह, बी–पॉझिटिव्ह, एबी–पॉझिटिव्ह, एबी–निगेटिव्ह, ओ– पॉझिटिव्ह, ओ–निगेटिव्ह असे शब्द ऐकतो. यातील ए–पॉझिटिव्ह याचा अर्थ ए–आरएच पॉझिटिव्ह असा आहे. ए–निगेटिव्ह याचा अर्थ ए–आरएच निगेटिव्ह असा आहे. पॉझिटिव्ह–निगेटिव्ह याचा थोडक्यात अर्थ आरएच पॉझिटिव्ह आणि आरएच निगेटिव्ह असा आहे. आरएच शब्द ठहर्शीीी माकडावरून घेतलेला आहे. या जातीच्या माकडातही हा रक्तगट आहे. त्यातील पहिली दोन अक्षरे घेऊन ते नाव या रक्तगटाला देण्यात आले.

आरएच रक्तगट ठरवणारे अँटिजेन तांबड्या पेशींवर असतात. आरएच–निगेटिव्ह माणसाला आरएच–पॉझिटिव्ह रक्त दिले तर त्याचे शरीर या अँटिजेनविरुद्ध अँटिबॉडी तयार करते आणि आरएच–पॉझिटिव्ह तांबड्या पेशींचा नाश करते.आरएच–निगेटिव्ह स्त्री आणि आरएच–पॉझिटिव्ह पुरुष यांचे लग्न झाले तर त्यांना होणारे मूल आरएच–पॉझिटिव्ह किंवा आरएच–निगेटिव्ह असू शकते. मूल आरएच–निगेटिव्ह असेल तर काळजी नाही; परंतु होणारे मूल आरएच–पॉझिटिव्ह असेल तर मात्र मुलाच्या रक्तातील तांबड्या पेशीतील आरएच अँटिजेनविरुद्ध आईचे शरीर अँटिबॉडी तयार करू लागते. या तयार झालेल्या अँटिबॉडी नाळेद्वारे गर्भावस्थेत मुलाच्या रक्तात जातात. त्यामुळे होणाऱ्या मुलाच्या रक्तातील बहुसंख्य तांबड्या पेशींचा नाश होतो. त्यामुळे मुलाला घातक अॅनेमिया किंवा कावीळ होऊ शकते. पहिल्या आरएच–पॉझिटिव्ह मुलापेक्षा दुसऱ्या आरएच–पॉझिटिव्ह मुलाच्या वेळी हा त्रास जास्त होतो. याचे कारण म्हणजे पहिल्या मुलाच्या वेळी आईच्या शरीरास आरएच–पॉझिटिव्ह तांबड्या पेशींविरुद्ध अँटिबॉडी तयार करण्याचे प्रशिक्षण मिळालेले असते! त्यामुळे पुढच्या आरएच–पॉझिटिव्ह मुलाच्या वेळी आईचे शरीर जास्त वेगाने आणि जास्त प्रमाणात आरएच तांबड्या पेशीविरुद्ध अँटिबॉडी तयार करते. त्यामुळे यावेळी जास्त प्रमाणात मुलाच्या तांबड्या पेशींचा नाश होतो. या रोगाला इरिथ्रोब्लास्टॉसिस फिटॅलिस असे म्हणतात. यावरून लक्षात येईल की लग्नाआधी रक्तगट का पाहिला पाहिजे. अर्थात यावर हल्ली उपाय निघालेले आहेत. आरएचविरोधी अँटि–डी इंजेक्शने देऊन यातून सुटका होऊ शकते.सन १६६५मध्ये ब्रिटिश डॉक्टर रिचर्ड लोवर यांनी सर्वप्रथम एका कुत्र्याचे रक्त दुसऱ्या कुत्र्याच्या शरीरात यशस्वीपणे पोहोचवले. त्यानंतर जवळजवळ दीडशे वर्षांनी सन १८१८मध्ये एका माणसाचे रक्त दुसऱ्या माणसास यशस्वीपणे (योगायोगाने रक्तगट जुळल्यामुळे!) दिले गेले. याचे श्रेय डॉक्टर जेम्स ब्लन्डेल यांना. परंतु खऱ्या अर्थाने एका माणसाचे रक्त दुसऱ्या माणसास सुरक्षितपणे देण्यात येऊ लागले ते सन १९०१नंतर. म्हणजेच रक्तगटाच्या शोधानंतर. म्हणूनच या शोधाचे मोल फार मोठे आहे.



# लय अवघड हाय गड्या उमगाया बाप रं...!

लोकनेता न्यूज नेटवर्क

करलो दुनिया मुठ्ठी मे! म्हणत संगणक, इंटरनेट, मोबाईल आणि मिडीयाने संपूर्ण जग एका क्लिकवर आले. याचा परिणाम म्हणजे जगातल्या कोणत्याही देशातील मानवतेचे उत्सव त्या देशापुरते मर्यादित न राहता ते वैश्विक झाले. जगभर साजरे होणारे सण, उत्सव, समारंभ आणि विशेष दिवस म्हणजेच स्पेशल डेज जगभर साजरे केले जाऊ लागले. अलीकडे २१ जून जागतिक योग दिवस म्हणून जगभर साजरा होतोय. त्यातच १९१० साली अमेरिकेत सोनोरा स्मार्ट डॉड या लेकीने नागरी युद्धात शहीद झालेल्या वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जून महिन्यातील तिसरा रविवार फादर्स डे म्हणून साजरा केला आणि लोकांनी पण त्याला पाठींबा दर्शविला. आज बदलत्या विश्व संस्कृतीचा प्रभाव सर्वत्र जाणवू लागला, परिणामी भारतातसुद्धा फादर्स डे मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातोय. आई–वडिलांचा एखादा विशिष्ट दिवस असूच शकत नाही, आपले सर्व दिवस केवळ त्यांच्यामुळेच आहेत. तरीही त्यांच्याप्रती विशेष कृतज्ञता व्यक्त व्हावी या उद्देशाने फादर्स डे साजरा करणे ठीक आहे.

आई–वडील आपल्यासाठी काय आणि किती करतात(?) हे सांगायची गरज नाही. आत्तापर्यंत आईवर प्रचंड काव्य, कथा, कादंबरी लिहिली गेली, परंतु बिचारा बाप म्हणावा तेव्हढा कुठं बाहेर आलाच नाही. घर खांद्यावर घेवूनही बाप तसा घरात दूर्लक्षितच! वृद्ध बाप, लेकांनी घराबाहेर काढला आणि त्याचे विशेष दुर्दैव म्हणजे बिचारा लेखनातही उपेक्षितच राहिला. उपयोगितेचा सिद्धांत सर्वत्र लागू होत असला तरी; नात्यांना तो लागता कामा नये. अलीकडे माणुसकीची जमीन वांझ होत चाललीय. सिमेंटच्या पक्क्या घरात राहून माणूस टणक झाला आहे. ओलावा संपतोय! एकेकाळी मातीच्या भिंतीचा ओलावा माणसात झिरपायचा. घरात गाई, वासरं असायचे. मुक्या प्राण्यांना जीव लावला जायचा. आपल्या गोठ्यातील एखादी गाय थकली, दुध देणे बंद झाले तरीही तिचे उपकार जाणले जायचे. मरेपर्यंत सांभाळली जायची, तिची सुश्रुषा केली जायची. आता घरात गाय अन् बाप–माय दिसत नाहीत. रस्त्याने जातांना हजारो एकरवर अगदी तुरळक झाडं दिसतात. जुन्या झाडांची छाया–माया घरांना मिळणे बंद झालंय. कुठंतरी आजी–आजोबा–नातवंड असे दुर्मिळ चित्र पहायला मिळते आहे!

बाप म्हणजे घराचे छप्पर! पाठीचा कणा, घरातील दाळ–दाणा. जावे त्याच्या वंशा तेंव्हा कळे. बापाचा घरात आणि आपल्या लेकरांत किती जीव असतो(?) ते आपला जेष्ठ पुत्र श्री राम वनवासात गेल्यानंतर प्राणत्याग केलेल्या अयोध्येच्या राजा दशरथांना विचारा. आपल्या लेकरांना बुरसटलेल्या समाजाने वाळीत टाकले, त्यांना मानासन्मानाने जगता यावे म्हणून देहांत प्रायश्चित घेणाऱ्या निवृतीनाथ, ज्ञानदेव, मुक्ताई आणि सोपान यांना विचारा माय–बाप! सर्वांना आई आवडते; परंतु बाप आवडत नाही असे चित्र पहायला मिळते. सर्व माणसे चांगली आहेत, मात्र सर्व वडील खाष्ट आहेत असा एक इंग्रजीत वाक्प्रचार आहे. बापाचे मुलगा म्हणून अनुभव घेणं आणि स्वतः बाप होऊन स्वतः अनुभवणं या दोन्ही अवस्थेत जमीन अस्मानचे अंतर आहे. आपण जेंव्हा मुलगा म्हणून वावरतो, तेंव्हा आपल्याला बऱ्याच वेळा आपले वडील आवडत नाहीत, त्यांची मते पटत नाहीत. एवढेच काय अनेकदा आपल्याला आपले वडील आपले शत्रू वाटायला लागतात. अलीकडे तर अनेक घरात मुलगा आणि वडिलांचे संवाद बंद आहेत, असे अनेक बाप मला सांगत असतात किंवा काही मुलेही मोठेपणाने सांगत असतात, मी आणि माझे वडील मागील पाच वर्षांपासून बोलत नाहीत! संवाद बंद होणे हे कुटुंब आणि समाजासाठी मोठे घातक आहे. त्यातून बाप–लेकातील अंतर वाढत जाते. त्यासाठी दोघांनी वेळीच आपआपल्या मताला मुरड घालून घरातील थांबलेला संवाद सुरु ठेवणे क्रमप्राप्त आहे. मतभेद असावेत, मनभेद नको!



प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो.९१५८०६४०६८

आमच्या बाबांना जाऊन तब्बल बारा वर्षे लोटलीत. खरंच माणसं सोबत असतांना, जिवंत असतांना त्यांच्या अस्तित्वाची जाण होत नाही. काही नाती मोठी विलक्षण आणि विलोभनीय असतात. ते शब्दात मांडणे मोठे कठीण काम आहे. मला आजही आठवतंय. मी बारावीला होतो तेंव्हाची गोष्ट आहे. मी औरंगाबादला शिकायला होतो. मित्राच्या सायकलवरून पडल्यामुळे गुडघ्याला जब्बर मार लागला होता. दवाखान्यात जाऊन, गोळ्या–औषध घेऊनही गुडघ्यावरची सूज कमी होत नव्हती. मी गावाकडे आलो. काय करावे काहीच सुचत नव्हते. आमचे घर कट्टर शाकाहारी आणि एकादशी करणारे वारकरी कुटुंब! आमचे बाबा नामांकित मृदंगाचार्य! असे असतांना माय बाबांना म्हणाली, आवं, पंधरादी झाले, बब्याचा टोंगळा उतरतच नाही. काहीतरी गाव खानगी ईलाज पहा बरं. लगेच बाबा उठले, कुठं गेले माहिती नाही. बाहेर जाऊन रगत बोळ, अंबे हळद आणि एक अंडे घेऊन आले. माझ्या गुडघ्यावर ते सर्व मिश्रण योग्य पद्धतीने लावले आणि काय आश्चर्य? तीन दिवसांत गुडघा सर्रकन उतरला. कोणतेच औषध कामी येत नाही, तेंव्हा माय–बाबांचा अनमोल स्पर्श रामबाण औषध म्हणून काम करत असतो! आजही घरी चहा पितांना मला माय–बाबांची आठवण येते. दोघेही पितळेच्या परातीने चहा प्यायचे आणि थोडा शिल्लक राहिलेला मला द्यायचे! त्या चहाची चव आजही माझ्या ओठांवर रेंगाळतांना डोळे भरून आले आहेत. आज माय जाऊन २२ आणि बाबा जाऊन १२ वर्षे झालीत. त्यांच्यानंतर त्या मायेने, वात्सल्याने माझी कुणी विचारपूस केलेली मला आठवत नाही! आमचे बाबा तर महात्मा होते, महात्मा! तेव्हढा शांत, संयमी आणि धीरगंभीर माणूस मी अजून पाहिला नाही! माय गेली तेंव्हा बाबा एकटेच बाजूला उभे होते. आम्ही बोलतांना, मला काही सांगू नका. गप बसा एवढंच बोलले, बस्स! त्यानंतर अपघातात आमचे मोठे दादा गेले, तेंव्हा मात्र बाबा खूप तुटल्यासारखे झाले होते. ते रडलेले दिसले नाही; परंतु त्यांच्या डोळ्यात अख्खा समुद्र दाटलेला मी पहिला आहे! आपलं पहिलं अपत्य आपल्यासमोर अपघाती जातं, हे दुःख ज्याचं त्यालाच माहित! त्यांतर बाबा एकदम शांत आणि अबोल झाले. बाबांच्या अनंत आठवणी आहेत, ज्या लिहितांना डोळे अखंड वाहतांना बाप–ल्योक चित्रपटातील 'लय अवघड हाय गड्या उमगाया बाप रं' गाणं हळूवार स्पर्शून जातं!

माय–बाप वाचकहो! आपल्या घरातील बाप समजून घ्या. तो आपल्या देहाचं पांघरून घरा–लेकरांवर घालत असतो. घरापुढं त्याला त्याचा जीवसुद्धा कवडीमोल वाटत असतो. माझ्या लेकराला काहीच कमी पडणार नाही यासाठी तो जीवाची बाजी लावतो! बापाचा लेकीत जरा जास्तच जीव असतो. आमचे बाबाही बाईच्या (बहिण) बाबतीत फार हळवे होते. आडगाव बाजारला माळावरून पार्डीवून पायी जायचे. पाय दुखले तरी चालतील, पण येता–जाता लेकीची भेट होते, तेवढंच समाधान! चला तर मग हा बाप नावाचा अनमोल माणूस जपूया! त्यांच्याप्रती कृतज्ञ भाव व्यक्त करतांना जगातील कोणताही बाप–माय वृद्धाश्रमात जाणार नाही यासाठी प्रार्थना करतांना ज्यांच्यामुळे आपण या जगात आलो त्या माय–बाबांचे मनोभावे दर्शन घेऊयात! मातृ–पितृ देवो भवः!

# राज साहेब ठाकरे यांना उदंड आयुष्य लाभण्यासाठी माँ जिजाऊ चरणी साकडे

लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । प्रतिनिधी



महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हा बुलडाण्यातील मा राज साहेब ठाकरे यांच्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या निष्ठावंत महाराष्ट्र सैनिकांच्या वतीने संपुर्ण बुलडाणा जिल्ह्यात दिनांक १४ जून रोजी राजसाहेब ठाकरे यांच्या ५६ व्या वाढदिवसाच्या अनुषंगाने विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.सिंदखेड राजा तालुक्यात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. निष्ठावंत राज समर्थक हा उपक्रम जिल्ह्यात राबवणार आहेत. वास्तविकता गांभिर्याने घेता उष्णतेची त्रिवता आणि पाणीटंचाई लक्षात घेता वृक्षारोपण ही काळाची गरज झालेली आहे, पुढील काळात येणाऱ्या संकटाच्या उपाययोजना म्हणून पुन्हा हे विदारक चित्र समोर येऊ नये हा दूरदृष्टीकोण बाळगुन माननिय राज साहेब ठाकरे ह्या नेत्याच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम राबवत असताना शाळा,महाविद्यालय,मंदिराचा परिसर,तसेच मैदान अशा ठिकाणी हे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. जेणेकरून वृक्षारोपण हे नुसते फोटो पुरते न करता वास्तविकतेत ते झाड जगले पाहिजे यावर भर दिला जाणार आहे.ज्याप्रमाणे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात हा उपक्रम राबविला जाणार आहे म्हणून मनविसे बुलडाणा जिल्हाध्यक्ष शिवादादा पुरंदरे यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवून या संकल्पनेला बळ दिले आहे,या उपक्रमांतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील भारतीय विद्यार्थी सेनेपासून माननीय राज साहेब ठाकरेंवर आजपर्यंत जीवापाड प्रेम करणाऱ्या सर्व महाराष्ट्र सैनिकांचा या मोहिमेत समावेश असणार आहे.या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत आत्महत्याग्रस्त व गरजू शेतकऱ्यांना शासकीय मदत तत्परतेने लवकर कशी मिळवुन देता येईल हा संकल्प देखील केला आहे. माननिय राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने जिल्ह्यात प्रतेक तालुक्यात शेतकरी व विद्यार्थांसाठी तक्रार निवारण केंद्र उभारणार आहे.सोबतच अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गरिबीवर मात करणाऱ्या आणि आपलं यश गाठणाऱ्या इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच आपली परिस्थिती नसतानाही त्यावर मात करीत एखाद्या फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेणारे या विद्यार्थ्यांचे कौतुक समारंभाचे आयोजन मनसेच्या वतीने करण्यात येणार आहे. यासोबतच मनसेच्या वतीने संपूर्ण जिल्हाभरात विविध समाज उपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे असे बुलडाणा जिल्हा मनसेच्या वतीने जाहीर करण्यात आले.

# सागरी साहचर्य

लोकनेता न्यूज नेटवर्क

सागरातल्या जलचरांच्या जीवनप्रणालीत मोठे वैविध्य आढळते. यापैकी काही प्रजातींमध्ये असलेले आपुलकीचे साहचर्य तर फार विस्मयकारक आहे! अशा प्रकारच्या सहजीवनात (सिम्बायोसिस) दोन भिन्न प्रजातींचे प्राणी एकाच जागेत भागिदारीत राहतात.

सागरातल्या जलचरांच्या जीवनप्रणालीत मोठे वैविध्य आढळते. यापैकी काही प्रजातींमध्ये असलेले आपुलकीचे साहचर्य तर फार विस्मयकारक आहे! अशा प्रकारच्या सहजीवनात (सिम्बायोसिस) दोन भिन्न प्रजातींचे प्राणी एकाच जागेत भागिदारीत राहतात. एक जण दुसऱ्याला अन्न मिळवायला मदत करतो; तर कधी दुसऱ्याचे वाहन बनून त्याची वाहतूक करतो. एखाद्या शिकारी प्राण्याचा हल्ला झाल्यास मित्राला सावध करून त्याचे संरक्षण करतो, लपायला मदत करतो.

प्राण्यांतील सहजीवनाचे उत्तम उदाहरण म्हणजे निळे चमकदार पट्टे, मजबूत दात असलेले रेसेस मासे. सफाई कामगाराप्रमाणे हा मासा मोठ्या माशांच्या दातांमध्ये आणि जबड्यांमध्ये अडकलेले परजीवी, मृत पेशी आणि त्या माशांच्या त्वचेवर चिकटलेले नको असलेले पदार्थ वेचून काढतो, त्यावर ताव मारतो. त्यामुळे या छोट्या माशांना 'क्लीनर रेसेस' असेच नाव पडले आहे! या क्लीनर माशांची प्रवाळ भित्तिकांजवळ वस्ती असते. भूक लागली की, ते नृत्य केल्याप्रमाणे ठराविक हालचाल करून दर्शवतात की, आता सफाई केंद्र उघडले आहे, आता मोठ्या माशांनो या, रांग लावा! मग पोपटमासे आणि शार्क तिथे येऊन आपला जबडा वासून रांगेत थांबतात. पुढे क्लीनर मासा एकेकाच्या तोंडात शिरतो, सफाई करून त्यावर भोजन करतो! अशी 'स्वच्छता केंद्रे' पॅसिफिक आणि हिंदी महासागरात मोठ्या संख्येने आहेत.सागरी सहजीवनाचे आणखी एक उदाहरण म्हणजे रेमोरा मासे आणि बार्नाकल. हे दोघे जलचर हरित कासव आणि शार्क या दोघा मोठ्या प्राण्यांचा उपयोग चक्क वाहनाप्रमाणे करतात. रेमोरा आणि बार्नाकल या दोघांच्या कासव आणि शार्कच्या पाठीवर आपली पकड मजबूत करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. रेमोराचे पुढचे कल्ले कासव आणि शार्कची पाठ पकडून ठेवतात, तर बार्नाकल हे आपल्या लाळेतून एक चिकट द्रव शार्क आणि कासवाच्या पाठीवर सोडतो. त्यामुळे तो पाठीवर पक्का बसू शकतो. हे सर्व असते ते भक्ष्य शोधायला जाताना पोहोण्याचे श्रम वाचविण्यासाठी! पण हे सहजीवन एकतर्फी नसते. बदल्यामध्ये या मोठ्या वाहन प्राण्यांच्या पाठीवर चिकटलेल्या असंख्य त्रासदायक जिवाणूंना छोटे रेमोरा मासे खातात आणि स्वच्छ करतात, कासव आणि शार्कना ताजेतवाने करतात.

# खानवटे जिल्हा परिषद शाळेतील मुलांचे पहिल्या दिवशी पुष्पगुच्छ आणि फुगे देऊन केले स्वागत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दि. १५ रोजी शाळेचा पहिलाच दिवस दिड महिन्याची सुट्टी संपवून शाळेत आलेले विद्यार्थी काही जण हिरमुसलेले तर काहीजण प्रचंड उत्साही हेते.पहिलीच्या विद्यार्थ्यांची मात्र नवीन शाळा, नविन शिक्षक,नवीन मुले यामुळे फार मोठी उत्सुकता ताणलेली,मनाच्या एका कोपऱ्यात अनामिक भीतीही लपलेली अशा वातावरणात आज शाळेचा पहिला दिवस सुरू झाला. म्हणतात ना पेराल ते उगवतं या ऊक्तीप्रमाने गेल्यावर्षी शाळा व्यवस्थापन समिती आणि शिक्षकांच्या समन्वयातून वाढदिवसाच्या निमित्ताने वायफळ खर्च टाळून विद्यार्थ्यांना सुग्रास जेवण किंवा खाऊ देण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

त्यातच आज शाळेमध्ये पहिलाच दिवस असल्याने शिरा भाताचं गोड जेवण असतानाही शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रल्हाद यादव आणि सामाजिक कार्यकर्ते शरदराव ढवळे या दोघांचा वाढदिवस शाळेमध्ये साजरा करण्यात आला. शाळेच्या वतीने शाल,श्रीफळ देऊन दोघांचाही सत्कार करण्यात आला.दोन्ही मान्यवरांनी शाळेतील विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे बिस्किटांचे वाटप केले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अधिकच द्विगुणीत झाला.

याचवेळी शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप,तसेच इयत्ता पहिली मध्ये प्रवेश करणाऱ्या नवागतांचा फुगे देऊन,गंधाचा टिळा लावून स्वागत करण्यात आले. यावेळी रंगनाथ ढवळे, माजी सरपंच बबनराव धायतोंडे,तंटामुक्ती अध्यक्ष दिपकराव ढवळे, ग्रामपंचायत सदस्य वैभव लोखंडे,शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष सौ.जयश्री चव्हाण,सदस्या सौ. मयूरी यादव,सौ.प्रियांका लोखंडे, रामदास धायतोंडे,मारुती ढवळे,विश्वजित गायकवाड यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते अमित चांदगुडे,चंद्रकांत गाडे, रामदास चव्हाण,गणेश लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांचे शाळेच्या वतीने आभार माणून सत्कार करण्यात आला.पहिल्याच दिवशी आलेल्या शाळेतील सर्व मुलां-मुलींना पालक आणि शिक्षक वृंद यांनी पुष्पगुच्छ,पुस्तके,फुगे देऊन आणि बिस्किटे वाटून त्यांचे स्वागत केले.

तसेच शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. बंडगर सर यांनी मुलांना पहिल्याच दिवशी अतिशयचे गोड आवाजात सुत्रसंचालन करताना मोलाचे मार्गदर्शन केले.यावेळी सौ. अर्चना भिसे मॅडम, श्री.बनसोडे सर,आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बंडू निसर्गंध यांचा शेकडो कार्यकर्ते सह माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या गटात जाहीर प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



पेठ बीड विभागातील बंडू निसर्गंध यांनी माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून दिनांक १५ जून २०२४ रोजी जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या उपस्थितीमध्ये शेकडो कार्यकर्त्यांसह जयदत्त अण्णा क्षीरसागर गटात प्रवेश केला या प्रवेश सोहळा वेळी कार्यकर्त्यांचा कार्यकर्ता होण्यापेक्षा यांनी हा प्रवेश केला यावेळी मोठ्या संख्येने बंडू निसर्गात यांचे समर्थक उपस्थित असल्याचे पहावयास मिळेल या प्रवेश सोहळ्यास मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी बंडू निसर्गंध यांनी मांडलेल्या प्रश्नावरही उत्तर देताना असे सांगितले की येणाऱ्या काळामध्ये पेड बीड भागातील विकासावर जास्तीत जास्त लक्ष देऊन विकास करण्यात येईल बंडू निसर्गांत यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी प्रवेश केला यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मुखीद लाला, नाना मस्के, प्रमोद शिंदे, कपिल सोनवणे, सनी वाघमारे,लक्ष्मण (तात्या) मस्के,कल्याण डोंगरे,उत्तम सोनकांबळे, भैय्या साळवे, सुनील निसर्गंध विकी डोंगरे, महेश जाधव, रामा जाधव, सुनील बोचरे,सुधाकर नाईक,रवी शेळके, गणेश शेळके,अमित सपकाळ, भागवत जाधव, भागवत जाधव,शिवाजी जाधव, रमेश गाताडे, साळवे सर, सुदेश कांबळे,विशाल मस्के,विपुल मस्के, सौरभ धनवे,प्रतीक काकडे, कपिल इंकर, बाबासाहेब विणकर,आदित्य राठोड, प्रमोद जाधव,अशोक काकडे, गायके सर, शिवाजी मनोहर,सिद्धांत काकडे, कृष्णा काकडे, अनिल डोंगरे,पप्पू डोंगरे, संतोष सोनकांबळे, जितेश धनवे, प्रताप धनवे, आकाश खेमाडे, नितीन कांबळे,प्रेम निसर्गानं,शुभम धनवे,नारायण गुंजाळ,महादेव गुंजाळ,दत्ता गुंजाळ,मुन्ना धनवे, बंटी भोले इत्यादी उपस्थित होते.

# गुरुदेव दादोजी कोंडदेव विद्यालय मलठण प्रशालेत पहिल्या दिवशी पुष्प गुच्छ देऊन मुलांचे स्वागत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दि.१५ रोजी मलठण ता.दौंड येथील शाळेची सुरूवात सुंदर अशा सकाळच्या वातावरणात सोनेरी किरणांनी झाली.प्रशालेतील जेष्ठ शिक्षक श्री.पहाणे सर यांनी छान परिपाठ घेतला.विद्यार्थी यांनी पंचांग व बोधकथा सांगितली.मुख्याध्यापक श्री.मांडगे सर यांनी नव्याने आलेल्या विद्यार्थ्यांचे फुले देऊन स्वागत केले.

तसेच पालकांचेही स्वागत केले.आपल्या सुमधुर वाणीने विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नविन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.शाळेतील इयत्ता पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांना शासनाने दिलेली पाठ्यपुस्तके यांचे वाटप मुख्याध्यापक श्री.मांडगे सर आणि पालक यांच्या हस्ते देण्यात आली.या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर ककर्मचारी वृंद व पालक उपस्थित होते.अशाप्रकारे प्रशालेच्या पहिल्या दिवसाची सुरुवात आनंदी वातावरणाने झाली.

# पाटोदा शहरातील हजरत राज मोहम्मद चौकाला आले तलावाचे स्वरुप

## सिमेंट रस्ता व भुयारी नालीचे काम करा नसता आंदोलन-राहुल जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाटोदा शहरातील मुख्य प्रवेशद्वार पैठण-पंढरपूर तसेच जामखेड -पाटोदा जाणारे राष्ट्रीय महामार्ग आहे. या ठिकाणी पैठण-पंढरपूर अर्धवट काम झाल्याने नागरिकांना व प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

सिमेंट रस्ता व भुयारी नालीचे तात्काळ काम करा नसता आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली आहे. पाटोदा शहरातील मुख्य प्रवेशद्वार हजरत राज मोहम्मद चौकात पहिल्याच पाऊसात तलावाचे स्वरुप आले होते. या मुळे नागरिकांना व प्रवाशांना नाहक येथे सतत त्रास सहन करावा लागत आहे. या मुळे येथील तात्काळ रस्त्याचे व भुयारी गटार चे काम करुन नागरिकांना या त्रासापासून सुटका करावी नसता येथील नागरिकांच्या माध्यमातून आंदोलन करण्याचा इशारा देत आहे.

पैठण-पंढरपूर/जामखेड-पाटोदा या राष्ट्रीय महामार्गावरील हजरत राज मोहम्मद चौक रस्त्यावर पाणी जमा होवू लागले. या ठिकाणी तलावाचे स्वरुप निर्माण झाल्याने वाहतूकीला अडथळा निर्माण होवू लागला. त्या मुळे ग्रामस्थांना व प्रवाशांना त्रास होत आहे. याची दखल पाटोदा नगर पंचायत व राष्ट्रीय महामार्ग अधिकार्यांनी घेऊन ज्या ठिकाणी पाणी जमा होते त्या ठिकाणी सिमेंट रस्ता व भूयारी नाली काढण्यात यावी नसता येथील नागरिकांच्या माध्यमातून आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

# मलकापूर येथे महेश नवमी मोठ्या थाटात साजरी

## शंकर-पार्वती वेशभूषा परिधान सादरीकरण ठरले आकर्षण



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा दिनांक १५ जून रोजी महेशनवमी निमित्त मिरवणूक साजरी करण्यात आली हजारोंच्या संख्येने महेश्वर भक्तांनी मिरवणूकीत सहभाग नोंदवला.पुरुषांनी स्वेत वस्त्र तर महिलांनी लाल साडी परिधान केली होती. महेश भजन म्हणत बेंड बाजाच्या तालावर महेश्वर भक्तांची पाऊले थिरकत होती.

या मिरवणुकीत सहभागी महेश्वर भक्तांनी मलकापूर मधील मुख्य चौकातून भव्य मिरवणूक काढली अतिशय धूमधडाक्यात महेश भजन म्हणत बेंड वाद्याच्या तालावर महिला पुरुषांच्याची पावले थिरकली.रथावरील शंकर पार्वतीच्या वेशभूषेतील सादरीकरण मिरवणुकीचे आकर्षण ठरले होतें. भगवान महेश्वर ची मूर्ती विराजमान असल्यामुळे शोभून दिसत होती. या महेश नवमी मिरवणूकित सर्व हिंदू धर्मीय महेश्वरी समाजाने हजारोच्या संख्येने सहभाग घेतला होता. तर या मिरवणुकी नंतर महाप्रसादाचे वितरण महेश्वरी भवन येथे करण्यात आले तर या कार्यक्रमात माझी आमदार चैनसुख संचेती यांनी सुद्धा हजेरी लावली होती. तर या कार्यक्रमाची सांगता महेश भवन येथे करण्यात आली.

# शिंदी-चंदनपुर शिवारातील फुटलेल्या नादुरुस्त तलावाचे पाणी कोठे पाझरले

## माती टाकून केलेल्या पाझर तलावाच्या निकृष्ट कामाची चौकशी करा उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्याकडे तक्रार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

शिंदी व चंदनपुर शिवारातील सीमेवर पाझर तलावाची निर्मिती करण्यात आली होती या पाझर तलावामुळे २५ हेक्टर शेतजमीन पाण्याखाली येणार होती,परंतु संबंधित ठेकेदार व अधिकारी यांनी संगणमत करून पाझर तलावाची जी भिंत आहे त्या भिंतीवर फक्त काळी मातीचा थर टाकला होता कुठल्याही प्रकारची दबई केल्या गेली नसल्यामुळे सदर बाजार तलाव २० सप्टेंबर २०२० साली फुटला होता यामध्ये १८ शेतकऱ्यांचे पिके खरडून गेली होती त्यांना आज पर्यंत एकही रुपयाची मदत शासनाने दिली नाही,परंतु चार वर्षे उलटले तरी सुद्धा जलसंधारण विभागाच्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी या फुटलेल्या बाजार तलावाकडे ढुंकून सुद्धा बघितले नाही ? त्यामुळे सदर पाझर तलावाच्या नावाखाली किंवा दुरुस्तीच्या नावाखाली लाखो रुपये हडप केल्याची शंका उपस्थित होत आहे या पाझर तलावाकडे कुठल्याही कर्मचारी लक्ष देण्यासाठी पुढे येत नसून तलाव फुटण्याच्या अगोदर सुद्धा शेतकरी बांधवांनी कर्मचाऱ्यांना सूचना दिली होती त्यामुळे सदर नादुरुस्त पाझर तलावाच्या संबंधित सर्व कामाची चौकशी करून दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांची व ठेकेदारांवर कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन खंडारे यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद देऊळगाव राजा यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.त्यामुळे लवकरात लवकर चौकशी लागून सत्य बाहेर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# माणकोबावाडी शाळेचा परिसर विध्यर्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजला;विविध उपक्रमाने नवीन शैक्षणिक वर्षाची उत्साहात सुरुवात



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

माणकोबावाडी (यवत) ता.दौंड दि. १५ जून रोजी उन्हाळ्याच्या सुट्टी नंतर आज शाळा पुन्हा सुरु झाल्याने शाळेचा परिसर गजबजून गेला.इयत्ता १ ली मध्ये दाखल होणाऱ्या मुलांचे ढोल ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. विध्यार्थ्यांचे औक्षण करून शाळेत प्रवेश देण्यात आला.शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व मुलांना पाठ्यपुस्तकाचे वाटप केल्याने सर्व विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने फुलले होते. यावेळी ग्रामस्थानी विध्यार्थ्यांना वह्या,पुस्तके, दप्तर व लेखन साहित्याचे वाटप केले.

पहिल्या दिवशी मुलांसाठी मिष्ठान्न भोजनाची व्यवस्था केली होती. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती वसंत माने यांनी शाळेतील विविध उपक्रमाची माहिती ग्रामस्थांना दिली. याप्रसंगी,शिक्षक विक्रम लांडगे,संदीप साळवे,ग्रामपंचायत सदस्या नंदा बिचकुले,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोहर खताळ, सुस्मिता मोरे,मंगल खताळ,विलास पिंगळे तसेच पालक आणआणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावेंच्या पालकमंत्रिपदासाठी भाजपचे फडणवीसांना साकडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

राज्याचे गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांना छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री करावे, असे निवेदन भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुंबई येथे राज्याच्या बैठकीप्रसंगी शुक्रवारी (१४ जून) दिले. भाजपच्या शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनावर विचार करू, एवढेच फडणवीस म्हणाले. शहर जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी शिष्टमंडळात होते.पालकमंत्री संदिपान भुमरे लोकसभा निवडणुकीत विजयी झाले. त्यामुळे पालकमंत्रिपद रिक्त होत आहे. छत्रपती संभाजीनगर पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार व राज्याचे गृहनिर्माणमंत्री अतुल सावे जालना जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. आपल्या स्वजिल्ह्यात काम करायला कधीही आवडेल, अशी प्रतिक्रिया सावे यांनी भाजप पदाधिकाऱ्यांच्या मागणीवर दिली होती. भाजपला जिल्ह्यात संघटन मजबूत करण्यासाठी पालकमंत्रिपदाचा वापर करायचा असल्याचे यातून स्पष्ट होते. जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर, प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर यांनीही सावे यांना पालकमंत्री करण्याची मागणी केली होती.लोकसभेत भाजपने संदिपान भुमरे यांना निवडून आणले. लोकसभेवर दावा असताना महायुतीत ठरल्याप्रमाणे मोदींना पंतप्रधान करण्यासाठी जागा शिंदेसेनेला सोडल्याचा भाजपचा युक्तिवाद आहे. शिंदेसेनेचे प्रवक्ते आ. संजय शिरसाट यांनी यापूर्वीच संबंधित जागा शिंदेसेनेची असून भाजप पदाधिकाऱ्यांची वैयक्तिक मागणी असू शकते असेही स्पष्ट केले.

दैनिक लोकनेता



# उदगीर तालुक्यातील सताळा बु. येथे शाळेच्या पहिल्या दिवशी वृक्षारोपण करून उत्सव उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**





उदगीर तालुक्यातील सताळा बु. येथे आज शाळेचा पहिला दिवस खूप उत्सहात साजरा करण्यात आला. ऑटो मधून नवागत मुलांना गळ्यात पुष्पाहार, मुकुट घालून गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. बिस्कीट, चॉकलेट, पुस्तकं देऊन नवागाताचे स्वागत करण्यात आले. पालकांना कढीपत्ता झाडें देऊन झाडें लावायला सांगितले. गटशिक्षणाधिकारी श्री शेख शेफ़ी साहेब , माजी सरपंच शिवलिंगप्पा जळकोटे, उपसरपंच सचिन सुडे मुख्याध्यापक संजय मळभागे यांच्या हस्ते ७० झाडें लावण्यात आली. १२० झाडाचे बियाणे लावून नर्सरी अमृतवाटिका तयार करण्यात आली. २५ झाडाचे वाढदिवस साजरे करण्यात आले.सर्व मुले शिक्षक गावकरी यांनी या फेरीत सहभाग घेतला. क्रांतिजोती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला सर्व मुलांनी पुष्प अर्पण करून वर्गात आज पहिले पाऊल टाकले. मुख्याध्यापक संजय मळभागे यांनी वांगे, मिरची, कांदे, टोमॅटो यांची रोपे लावून सुंदर परस बाग बनवली आहे. सर्व मुलांना पुस्तकांचे वाटप गटशिक्षणाधिकारी शफी शेखसाहेब,यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व १२ मुलांचे पहिल्याच दिवशी प्रवेश देण्यात आला. प्रभात फेरी बँड सह ऑटो मधून गटशिक्षणाधिकारी व नवीन मुले यांना घेहून काढण्यात आल्याने विशेष आकर्षण वाटले. लहान मुलांना झाड देऊन लागवड करून वृक्ष लागवड संदेश दिला गेला. सुंदर कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी गटशिक्षणाधिकारी श्री शफी शेख साहेब, माजी सरपंच शिवलिंगप्पा जळकोटे, उपसरपंच सचिन सुडे, शंकर गुरुडे, सचिदानंद पुटेवाड, मुख्याध्यापक संजय मळभागे, पांडे दिगंबर, दीपक जामकर, शिवशिवे राजकुमार, गेंदेवाड शिवाजी श्रीकांत कुलकर्णी, आगलावे सुलोचना यांनी परिश्रम घेतले.याच दिवशी दुसऱ्या सत्रात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर वडगावे साहेब, विस्ताराधिकारी शिवशंकर पाटिल साहेब यांनी शाळेला भेट देऊन समाधान व्यक्त केले. मुलांना मार्गदर्शन केले.पालकांचा झाड देऊन सत्कार करण्यात आला.

# सिनेकॉन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी हिंजवडी पुणे यांच्या कडून शाळेस संगणकांची भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



सिनेकॉन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी हिंजवडी चे डायरेक्टर श्री.रफिक नदाफ सर, राधाकृष्ण सिताराम गायकवाड सर यांच्याकडून जि.प.प्रा.शा कारखेल खु व जि.प.प्रा.शा बर्डे वस्ती कारखेल खु या शाळा ग्रामीण भागात असून येथील मुलांना संगणकाचे ज्ञान व्हावे यासाठी अंभोरा केंद्राचे माजी केंद्रीय मुख्याध्यापक कारखेल खु गावचे भूमी पुत्र आदर्श सेवा निवृत्त शिक्षक महादेव बाबा खुडे गुरूजी यांच्या सततच्या प्रयत्नामुळे दोन्ही शाळेला संगणक एक - एक संच देण्याची विनंती काही महिन्यांपूर्वी केली होती त्यांच्या मागणीला यश मिळाले असून शाळेच्या पहिल्याच दिवशी दोन्ही शाळेला प्रत्येकी एक - एक संगणक देण्यात आले आहेत व दुसरे आदर्श सेवानिवृत्त शिक्षक जगन्नाथ घुले गुरूजी यांनी पण दोन्ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला एक-एक लाऊडस्पीकर व सर्व विद्यार्थ्यांना दप्तर देण्यात आले आहेत याबद्दल यांचे कारखेल खु चे आजी माजी सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षण प्रेमी नागरिक, आष्टी तालुक्याचे कर्तव्य दक्ष गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव साहेब,विस्तार अधिकारी सिमाताई काळे / टकले,केंद्र प्रमुख जावेद पठाण,केंद्रीय मुख्याध्यापक अशोकराव शिंदे, कारखेल खु चे मुख्याध्यापक राजेंद्र शेकडे सर, बर्डे वस्ती कारखेल खु चे मुख्याध्यापक बाळासाहेब शिरसाठ सर व शिक्षक सुदर्शन घुले,विठोबा मुळे व आदि शिक्षक व गावातील व्यक्ती यांच्या कडून वरील सर्वांचे अभिनंदन आणि आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

# जल जीवन मिशन योजनेच्या नावावर गायखेड गावाला गटाराचे स्वरूप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**



लोणार तालुक्यातील मौजे गायखेड येथे मागील काही दिवसांपासून जल जीवन मिशन योजने अंतर्गत काम चालू आहे. सदर योजनेत पाण्यासाठी नवीन विहीर, पाईपलाईन, पाण्याची टाकी, नळ जोडणी असा एकंदरीत कार्यक्रम असतो. गायखेड येथे देखील जल जीवन मिशन योजना मंजूर झाल्या नंतर देखील गावकर्यांना आता तरी गावाला मुबलक पाणी मिळेल अशी आशा होती परंतु ठेकेदार यांच्या कामाच्या पद्धतीवरुन असे काही होईल असे दिसत नाही. कारण पाण्यासाठी विहीर तर खोदली परंतु त्या विहिरीला अद्याप पुरेसे पाणी लागलेले नाही. सोबतच विहिरी पासून गावापर्यंत पाईपलाईन चे काम अपूर्ण आहे. पाण्याच्या टाकीचा अजून शुभारंभ झालाच नाही असे सर्व असतांना देखील फक्त गावातील रस्ता खोदून संपूर्ण गावात नाल्या बनविल्या आहेत. त्यामुळे गावाला गटाराचे स्वरुप प्राप्त झाले आहे. सदर नाल्या भरून रस्ता पूर्वी प्रमाणे करण्याची जबाबदारी आता कोणीच घ्यायला तयार नाही. ग्रामपंचायत कार्यालयात या संदर्भात विचारणा केली असता जल जीवन मिशन योजने संदर्भात आम्हाला काहीच माहिती अजून नाही असे उडवाउडवीची उत्तरे मिळत आहेत. विशेष म्हणजे ठेकेदार अजून पर्यंत गावात आले देखील नाहीत त्यामुळे सर्वसामान्य जनतेने कोणाकडे विचारपूस करायची हा प्रश्न गावकर्यां समोर आहे.

## मा.संतोष पाटील वाहन निरीक्षक बीड यांच्यातर्फे

# नवजीवन संगोपन केंद्र आष्टी येथील गोरगरीब मुलांना शालेय साहित्यासाठी मदत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कडा । राजू म्हस्के**



आष्टी तालुक्यात नवजीवन फाउंडेशन संचलित नवजीवन संगोपन केंद्र येथे अनाथ,निराधार,ऊसतोड मजूर,वीटभट्टी कामगार, आदिवासी,भटके विमुक्त, गरीब,वंचित,दुर्लक्षित घटकातील मुलांचा मोफत सांभाळ करून शिक्षण दिले जाते. या नवजीवन संगोपन केंद्रास शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा मदत मिळत नाही सदरील केंद्र समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून आणि मदतीतून चालवले जात आहे. या अनाथ,निराधार मुलांना आता नव्याने शाळा चालू झाल्यामुळे शालेय साहित्याची खूप गरज होती. म्हणून फुल ना फुलाची पाकळी मदत व्हावी.तसेच आपणही समाजाचे काही देणे लागतो या उदात्त भावनेने आणि सामाजिक बांधिलकी जपत बीड येथील कर्तव्यदक्ष वाहन निरीक्षक संतोष पाटील साहेब यांनी नवजीवन संगोपन केंद्र आष्टी येथील अनाथ निराधार मुलांना शालेय साहित्याची गरज असल्यामुळे या मुलांना आवश्यक असलेले शालेय साहित्य देऊन सामाजिक बांधिलकी जपत या मुलांची गरज लक्षात घेऊन त्यांना शिक्षण घेता यावे या उदात्त भावनेने मदत केली.मूळचे पालघर जिल्ह्यातील असणारे पाटील साहेब सध्या बीड येथे मोटार वाहन निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. ते आपल्या कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य जनतेचे प्रश्न तातडीने सोडवतात.बीड सारख्या दुष्काळी भागात इमानदारीने आपले कर्तव्य पार पाडत असताना सामजिक बांधिलकी जपत आहेत त्यांच्या या कार्यास नवजीवन संगोपन केंद्र येथील गोरगरीब मुलांच्या वतीने खूप खूप शुभेच्छा दिल्या व शेवटी नवजीवन संगोपन केंद्र संस्थापक अध्यक्ष विकास म्हस्के मेजर यांनी मनापासून आभार मानले.

# पाटोदा दिवाणी न्यायालय परिसरात वृक्षारोपण

## वृक्षारोपणा सोबतच वृक्ष संगोपनही महत्त्वाचे न्यायाधीश श्रीमती ए.ए.पाटील मॅडम



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

दिनांक १४ जून-२०२४ रोजी पाटोदा न्यायालय परिसरामध्ये पाटोदा दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती ए.ए.पाटील मॅडम यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष अँड.सुशील कोठेकर, सचिव अँड.सचिन जावळे, उपाध्यक्ष अँड.सुधीर घुमरे, अँड.जगदाळे, अँड.अमरिश वैद्य,अँड.थोरवे, अँड.बी.बी.जावळे, सहाय्यक सरकारी वकील अँड.पांडव, अँड.तळेकर, अँड.विलास पवार इत्यादी विधिज्ञ तसेच पाटोदा न्यायालयाचे कुलकर्णी, धन्वे, गाडे, आशोक जाधव, आर्सुळ, पुजा वाघमारे सह इतर सर्व न्यायालयीन कर्मचारी अंमळनेर पोलिस स्टेशनचे येवले व पक्षकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मूरजी पटेल व मनीष नायर या दोन भावी आमदारांच्या उपस्थितीत के. ईश्वर फाउंडेशन अंतर्गत न्यूरोथेरपी प्रशिक्षण व आरोग्य केंद्राची स्थापना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । प्रतिनिधी**



के. ईश्वर फाउंडेशन (एनजीओ) अंतर्गत आशा आरोग्य केंद्राची स्थापना केली असून नुरोथेरपी, आयुर्वेद, निसर्गोपचार, होमिओपॅथी आणि मॉडर्न मेडीसिन द्वारे अत्यल्प दरात उपचार तसेच निदान करण्यात येणार आहे. सदर आरोग्य केंद्राचे उदघाटन शिवसेना शिंदे गटाचे भावी आमदार मनिष नायर यांच्या हस्ते भाजपा नेते मुरजी पटेल यांच्या उपस्थितीत झाले

के. ईश्वर फाउंडेशन च्या सर्वे-सर्वा श्रीमती एम. राणीताई वाघमारे यांच्या नेतृत्वात संस्था सामाजिक कार्यात अग्रेसर असून सर्वतोपरी जनकल्याणासाठी उपक्रम राबविण्यात येत आहेत.साईधाम गौतम नगर येथे महापालिकेच्या निधीतून के. ईश्वर फाउंडेशन चे मार्गदर्शक विद्रोही पत्रकार डॉ. राजन माकणीकर यांनी पाठपुरावा करून जनतेचे आरोग्य राखले जावे यासाठी परिसरातील मोकळ्या जागेत व्यायाम करण्याचे उपकरणे जोडली आहेत.या शिवाय आशा आरोग्य केंद्र उभारून अत्यल्प दरात रुग्णाची सेवा केली जाणार असून रिपब्लीकन पँथर नेते दिवंगत ईश्वर कांबळे साहेबांचे स्वप्न सत्यात उतरविले आहे. सदरील केंद्रात आठवड्यातून ३ दिवस स्त्री रोग तज्ञ, ३ दिवस नेत्र तज्ञ, २ दिवस ईएनटी, आणि लकवा, हाडाचे व नस दबली असलेल्या आजाराचे अतिशय कमी खर्चात चष्मा व रोगाचे निदान केले जाईल.आरोग्य केंद्र प्रमुख व फाउंडेशन चे उपाध्यक्ष डॉ. जितेंद्र कुमार यांनी आपल्या अनुभवातून हजारो रुग्णांना न्युरोथेरपी च्या माध्यमांतून बरे केले आहे. एनजीओ च्या माध्यमांतून वर्सोवा, अंधेरी, कांदिवली, मड व मालाड येथे न्युरोथेरपी केंद्र मागील ७/८ वर्षापासून चालू आहेत.न्युरोथेरपी ही आरोग्यदायक कला नवतरून व तरुणींनी शिकून आपल्या देशात चाललेली हाडे व नसांची दुःखी कमी करून स्वतःचं बेरोजगारपन कमी करून स्वावलंबी व निरोगी भारत बनविण्याच्या आमच्या धेयात सामील होवून फ्रांच्यायशी किंवा प्रशिक्षण घेवून सहभागी होवू शकता असा आशावाद जितेंद्र कुमार यांनी व्यक्त केला.के. ईश्वर फाउंडेशन च्या माध्यमातून जनहितार्थ बरेच उपक्रम राबवले जाणार असून राज्यभर फ्रांच्यायशी देवून अल्पदरात फ्रांच्यायशी घेण्यासाठी संस्थेच्या प्रतिनिधीशी संपर्क साधण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने बॉबी जाधव यांनी केले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904